# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०१७

## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत)

(क) : **सर्वश्री.हेमंत टकले,** धनंजय मुंडे, सतिश चव्हाण, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा – (सकाळी १०.०० ते १०.५५ वाजेपर्यंत) – (मंत्र्यांच्या उत्तरासह ५५ मिनिटे)–**

"क्लायमेंट चेंज आणि ग्लोबल वॉर्मिंग हे विषय २१ व्या शतकाच्या दुसऱ्या दशकाच्या समाप्तीवर येताना अत्यंत गंभीर बनले आहेत, अलिकडच्या काही वर्षात तर एकूण निसर्गचक्र कमालीचे अनियमित झाल्याचे अनुभवाला येते आहे, एकूणच पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन हे मानवी जीवनासाठी अत्यावश्यक बनले आहे, जल वायु सारखे नैसर्गिक स्त्रोत आज संकटग्रस्त झाले आहेत, सगळ्यात गंभीर प्रश्न शेतीच्या संदर्भात निर्माण झाले आहेत, अवेळी येणारा पाऊस, वादळे, तापमानातील वारंवार बदल यामुळे एकूणच अन्नधान्य निर्मितीवर खूप मर्यादा येऊ लागल्या आहेत, शेतीवरची संकटे दिवसेंदिवस वाढत आहेत, त्यामुळे आपल्या लोकसंख्येला पुरेल इतकी धान्यनिर्मिती सातत्याने होणे कठीण होत चालले आहे, सर्वसामान्यांच्या आरोग्यावरही मोठ्या प्रमाणात दुष्पपरिणाम झाले आहेत, नव्या रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे, वैद्यकीय क्षेत्रात तर साथीच्या रोगाची भर पडते आहे, आपल्या जगण्याशी संबंधित अशा सर्वच घटकावर हे अतिशय गंभीर संकट आले आहे, या परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्य शासनाने वैज्ञानिक पध्दतीने कामाची आखणी करायला हवी, केवळ राज्याचे प्रदुषण नियंत्रण मंडळ हे सर्व विषय हाताळण्या इतके सक्षम नाही हे लक्षात घ्यायला हवे, व्यापक पातळीवर पर्यावरण सक्षम आणि सजग करण्यासाठी नवी यंत्रणा तयार करायला हवी, या विषयातील संशोधनासाठी मोठी आर्थिक तरतूद करायला हवी, वाढत्या शहरीकरणाने महानगराचे असंख्य प्रश्न ज्यामध्ये कचऱ्यांची विल्हेवाट, सांडपाण्यावर प्रक्रिया अशा घटकांचा समावेश होतो, नद्यांचे संरक्षण, भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविणे, जमिनीचा पोत सुधारण्याचा कार्यक्रम अशा बाबींचा समावेश होऊ शकतो, या विषयाचे गांर्भिय लक्षात घेऊन विधीमंडळामार्फत एक समिती पर्यावरण समिती स्थापित करुन एक कृती कार्यक्रम तयार करावा, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(ख) : **(मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) –**

**श्री.सुनिल तटकरे,** श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.किरण पावसकर, **वि.प.स. यांची**

**म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा — (सकाळी १०.५५ ते ११.४५ वाजेपर्यंत) — (मंत्र्यांच्या उत्तरासह ५० मिनिटे) —**

"ओखी वादळामुळे मुंबईसह संपूर्ण कोकणात अतोनात नुकसान होणे, अरबी समुद्रातील या वादळामुळे रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या जिल्ह्यांतील किनारपट्टीचे अतोनात नुकसान होणे, दिनांक ४ डिसेंबर, २०१७ रोजी अवकाळी पावसाच्या जोरदार सरी कोसळून पिकांसह इतर मालमत्तेचेही नुकसान होणे, कोकणात आंबा व काजूची मोठ्या प्रमाणात लागवड असणे, परंतू अवकाळी पडलेल्या पावसामुळे आंबा व काजू पिकाचा मोहोर गळून पडणे, काही ठिकाणी मोहोर काळा पडल्याने तसेच गळून पडल्याने यावर्षी आंबा व काजू फळ पिकाच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होणे, यामुळे बागायत शेतीचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होणे, तसेच सुपारीची साठवणूक करणाऱ्या सहकारी संस्थांनाही सुपारी भिजल्यामुळे आर्थिक फटका बसलेला असणे, रायगड जिल्ह्यातील पांढरा कांदा उत्पादन करणाऱ्या भागातील मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान झालेले असणे, कोकणातील वाल, पावटा, तूर व इतर कडधान्य पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असणे, काही ठिकाणी मळणीची कामे सुरू असताना पाऊस पडल्याने धानपिकाबरोबरच भातपेंड्याचेही नुकसान झालेले असणे, त्यामुळे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण होणे, जगप्रसिध्द देवगड हापूस आंब्याच्या उत्पादनावर व त्याच्या दर्जावरही विपरीत परिणाम होणार असणे, कोकणातील प्रमुख व्यवसाय असणाऱ्या मच्छिमार व्यवसायाचे यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असणे, किनारपट्टीवर असणाऱ्या मच्छिमारांच्या राहत्या घराबरोबरच त्यांच्या बोटींचे नुकसान झालेले असणे, काही ठिकाणी मच्छिमारांच्या बोटी बुडालेल्या असणे, एकंदरीतच कोकणातील शेतकऱ्यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम झाल्याने तो आर्थिक संकटात सापडलेला असणे, फळपिकांवर आलेल्या संकटामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या अडचणीत आलेला असणे, कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचे लोण आता फळपिक नुकसानीमुळे कोकणातही सुरू होते की काय, अशी भिती शेतकऱ्यांकडून व्यक्त करण्यात येणे, त्यामुळे कोकणातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना व मच्छिमारांना त्वरीत नुकसानभरपाई देण्यासाठी शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे —**

(क) **नियोजन मंत्री** : "विदर्भ विकास मंडळ, नागपूर, मराठवाडा विकास मंडळ, औरंगाबाद आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ, मुंबई यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(ख) **गृहनिर्माण मंत्री** : "महाराष्ट्र भाडे नियंत्रण नियम, २०१७ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक याचिका – २०१५ / प्र.क्र. १७ / भाग-२ / गृनिधो-१, दिनांकित १८ नोव्हेंबर, २०१७" सभागृहासमोर ठेवतील.

(ग) **वैद्यकीय शिक्षण व जलसंपदा मंत्री** :

(१) "तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा अलग लेखा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) "तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा अठरावा वार्षिक वित्तीय अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(३) "महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचे वार्षिक लेखे व सन २०१६ चा अठरावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(घ) **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** :

(१) "वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई यांचा सन २०१३-२०१४ या वर्षाचा एकतीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) "सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाचा महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, मर्यादित (मुख्य कंपनी), शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी) यांचा एकत्रित वार्षिक अहवाल तसेच मुख्य कंपनी व उपकंपनीचे सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : "विधानपरिषद सदस्य अनुपस्थिती समिती (२०१७-२०१८) चा पाचवा अहवाल सादर करणे व त्यावर विचार करणे."**

**चार : वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचा पाचवा अहवाल (२०१६-२०१७) सादर करणे.**

**पाच : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने –**

**(मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने)**

**(अनुक्रमांक (१) व (२)) —**

(१) **श्री.संजय दत्त, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ३** वर **वैद्यकीय शिक्षण मंत्री** निवेदन करतील **:-**

"राज्यातील सरकारी रुग्णालयातील उपचाराचा खर्च सर्वसामान्य व गरीब रुग्णांच्या आवाक्याबाहेर गेल्याने सर्वसामान्य जनतेमध्ये पसरलेला असंतोष."

(२) **श्री.धनंजय मुंडे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक २** वर **कामगार मंत्री** निवेदन करतील **:-**

"दिनांक ८ डिसेंबर, २०१७ रोजी बीड जिल्ह्यातील वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्यातील ऊसाच्या गरम रसाचा हौद फुटून पाच कामगारांचा मृत्यू झाल्याची घडलेली घटना."

(३) **श्री.संजय दत्त, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ११** वर **मुख्यमंत्री** निवेदन करतील **:-**

"दिनांक १० डिसेंबर, २०१७ रोजी मुंबईतील वरळी पोलीस मुख्यालयातील सशस्त्र दलात पोलिसांकडून संरक्षणार्थ वापरली जाणारी जिवंत काडतुसे चोरीला जाण्याची घडलेली घटना."

(४) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ९** वर **महसूल** निवेदन करतील **:-**

"मु.पो. मिरा-भाईंदर येथील सेव्हन-इलेव्हन या कंपनीने पंजाब डेअरी फार्म येथील भुखंडावर बेकायदेशीररीत्या भराव टाकल्याने त्यांच्यावर केलेल्या दंडात्मक कारवाईस न जूमानता दंडाची रक्कम शासनाकडे जमा न करणे."

(५) **श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १३** वर **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** निवेदन करतील :-

"राज्यातील जनतेच्या जिव्हाळ्याच्या व अस्मितेच्या असलेल्या अरबी समुद्रातील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शिव स्मारकाचे काम सुरू करण्यासाठी होत असलेली दिरंगाईमुळे जनतेमध्ये पसरलेला असंतोष."

(६) **श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १८** वर **ग्रामविकास मंत्री** निवेदन करतील :-

"राज्यातील महा-ई-सेवा केंद्र बंद केल्याने चालकांवर कर्जबाजारी होवून उपासमारीची वेळ येणार असल्याने महा-ई-सेवा केंद्र बंद न करण्याची होत असलेली मागणी."

(७) **श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १९** वर **जलसंपदा मंत्री** निवेदन करतील **:-**

"पाचल, ता.राजापूर, (जि.रत्नागिरी) येथील दिवाळवाडी धरणाचे तसेच कालव्याच्या गळतीची दुरूस्ती करण्याबाबत."

(८) **ॲड.जयदेव गायकवाड, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १४** वर **सामाजिक न्याय मंत्री** निवेदन करतील :-

"डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडनमधील घर राज्य शासनाने विकत घेतले असले तरी या घराचे स्मारकात रुपांतर करून त्याचे लोकार्पण करण्याबाबत."

(९) **श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक १५** वर **पणन मंत्री** निवेदन करतील:-

"गेवराई, (जि.बीड) शासकीय तुर खरेदी केंद्रावर खरेदी झालेल्या तुरीचे पैसे देण्यास सब एजंट, बीड जिल्हा कृषी औद्योगिक सर्व सेवा सहकारी संस्था लि.बीड यांनी नकार देवून पैसे मागण्यांवर गुन्हे दाखल करण्याची दिलेली धमकी या प्रकरणाची चौकशी करून शेतकऱ्यांना पैसे अदा करण्याची होत असलेली मागणी."

**सहा : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **श्री. धनंजय मुंडे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मौजे वाघिवली, जि. रायगड येथील शेतकऱ्यांच्या जमिनी सिडकोद्वारे संपादित करण्यात येणे, सदर जमीनींच्या बदल्यात सिडकोमार्फत साडेबारा टक्के योजनेअंतर्गत सीबीडी बेलापूर, सेक्टर ३०/३१ येथे भूखंड क्र. ३, ४ व ४ अ हा भूखंड वाटप करण्यात येणे, सदर भूखंड वाटपामध्ये अनियमितता झाल्याबाबतच्या तक्रारी होणे, सिडकोमार्फत साडेबारा टक्के योजनेअंतर्गत जमिन वाटप करताना संरक्षित कुळांचे हक्क डावलण्यात येणे, संरक्षित कुळांनी आता न्यायासाठी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दाद मागूनसुध्दा कारवाई न होणे, न्याय न मिळाल्यास सामुदायिकरित्या आत्महत्या करण्याची परवानगी मागणारे निवेदन संबंधित शेतकऱ्यांनी मा.मुख्यमंत्री व पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्याकडे केलेले असणे, याप्रकरणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असणे, सदर साडेबारा टक्के योजने अंतर्गत वाटप करण्यात आलेले भूखंड स्वत:ची जमीन स्वत: न कसणारे जमिनमालक (absentee lord) यांना वाटप करणे, सदर संपादित केलेल्या जमिनीचा काही भाग मिठागरांमध्ये येत असताना सुध्दा साडेबारा टक्के योजनेअंतर्गत जमीनीचे वाटप करणे, सदर संपादित केलेल्या जमिनी कंपनीच्या नावाने असूनसुध्दा साडेबारा टक्के योजने अंतर्गत व्यतिरिक्त नावाने सेक्टर ३०/३१ येथे भुखंड क्र. ३, ४ व ४ अ, हा भूखंड वाटप करण्यात येणे, मुख्यभूमी व भूमापन अधिकारी, सिडको यांच्यामार्फत दिनांक २९ जानेवारी, २०१६ रोजी कारणे दाखवा नोटीस

बजावणे, सदर प्रकरणात खाडाखोड केल्याबाबत सदर प्रकरणाची चौकशी सुरु असणे, सदर प्रकरणाबाबत शासनामार्फत कोणतीही कार्यवाही होत नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली नाराजीची भावना, भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(२) **ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे शहरातील नदयांमध्ये मिसळणाऱ्या मैला पाण्यावर संपूर्ण प्रक्रिया करण्यासाठी तसेच मुळा-मुठा नदयांच्या स्वच्छतेसाठी केंद्र शासनाने मान्यता आणि अनुदान मंजूर करुन दोन वर्षे उलटल्यानंतरही त्यासाठी सल्लागार नेमण्याबाबत चलढकल सुरुच असणे, माहे ऑगस्ट, २०१७ पूर्वी सल्लागार नेमण्याचे आश्वासन यापूर्वी देण्यात आल्यानंतर आता नोव्हेंबरची नवी डेडलाईन देण्यात आलेली असणे, परंतु अद्यापही कोणतीच कार्यवाही केलेली नसणे, या कामासाठी जपानच्या जायका कंपनीकडून सुमारे ९०० कोटी रुपयांचे कर्ज मिळणार असून गेल्या दोन वर्षात त्यासाठी सल्लागार नेमण्यास अद्यापही मुहुर्त मिळालेला नसणे, त्यामुळे या प्रकल्पाला होत असलेल्या प्रचंड विलंब, परिणामी पुण्यातील जनतेच्या मनात निर्माण झालेले संभ्रमाचे वातावरण, निधी तातडीने उपलब्ध करुन पुण्यातील मुळा-मुठा नदीसुधार प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री. संजय दत्त, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात मोठ्या प्रमाणात माहितीच्या अधिकारांची प्रकरणे प्रलंबित असून गेल्या काही महिन्यापासून मुख्य माहिती आयुक्तपद रिक्त असल्यामुळे तब्बल अडीच हजार अपिले प्रलंबित असणे, नाशिक विभागीय माहिती आयुक्तांकडे सर्वाधिक १० हजार ६०० अपिले प्रलंबित असून पुणे विभागीय माहिती आयुक्तांकडे ८ हजार २४६, अमरावती विभागात ७ हजार ४००, औरंगाबाद ७ हजार तर कोकण विभागात ४ हजार अपिले असणे, मुख्य माहिती आयुक्त सर्व विभागीय माहिती आयुक्तांवर नियंत्रण ठेवत असतात मात्र गेल्या काही महिन्यांपासून हेच पद रिक्त ठेवण्यात आल्याने अनेक प्रकरणे प्रलंबित राहत असल्याने नागरिकांच्या हक्कावर गदा आणण्याचे काम होत असणे, वैयक्तिक माहितीच्या नावाखाली भ्रष्ट अधिकारी वर्गाची माहीती न देण्यासाठी शासनाने परिपत्रक काढत अशा पारदर्शक माहितीस वैयक्तिक माहिती कक्षेत आणत अपारदर्शक कामास चालना दिलेली असणे, माहितीचा अधिकार कायदयाच्या प्रचार व प्रसारासाठी राज्य शासनाने गेल्या ७ वर्षात ३३.४० लाख रुपयांची तरतूद केली पण प्रत्यक्ष केलेल्या खर्चाची माहिती

शासनाकडे नसणे, तसेच खासदार-आमदारांना दिल्या जाणाऱ्या माहितीवार शासनाकडून अंकूश आणण्यात येणार असून त्यांना कोणती माहिती दयायची याचे धोरण ठरविण्यासाठी गृह विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आलेली असणे, ती कोणत्याही फाईल वरील मंत्री किंवा सचिवांचे अभिप्राय आदी विरोधकांना व सामान्य लोकांना न देण्याचा सरकारचा यामागील डाव असणे, पारदर्शक कारभारासाठी तयार करण्यात आलेल्या माहितीचा अधिकार कायदयाची अशा प्रकारे पायमल्ली होत असतानाही याकडे राज्य शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत राज्य शासनाने तातडीने लक्ष घालून माहीती आयुक्तांची नियुक्ती त्वरीत करण्याची आवश्यकता व माहिती अधिकारातील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा होण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री. जयंत पाटील,** सुनिल तटकरे, धनंजय मुंडे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"काटोल (जि.नागपूर) येथील नगरपरिषदेमध्ये एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधार कार्यक्रमांतर्गत हेटी, बुधवार पेठ येथे एकूण १३० घरकुलांचे बांधकाम करून या कार्यक्रमांतर्गत ९० घरकुले लाभार्थी यादीनुसार लाभार्थ्यांना वाटप करण्यात येणे, उर्वरित ४० घरकुले राजकीय हितसंबंध जपणाऱ्यांना वाटप करण्यात येणे, सबब या कार्यक्रमांतर्गत ४० घरकुलांचे वाटप करण्याकरीता एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधार कार्यक्रम योजनेतील नियमाप्रमाणे लाभार्थ्यांची कोणतीही यादी सक्षम समितीकडून मंजूर केलेली नसणे, तसेच पंतप्रधान आवास योजनेंतर्गत काटोल नगरपरिषदेमध्ये कनिष्ठ अभियंता असतानाही श्री.तडस यांची प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात येणे, नगरपालिकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांनी श्री.तडस यांना केवळ ४-५ नमुना घरांचे नकाशे व प्राकलन बनविण्याचे शुल्क न देता ६०१ घरांसाठी शुल्काची आकारणी करून श्री.तडस यांनी स्वत:चा १३ लक्ष रुपयांचा अवाजवी आर्थिक फायदा करुन घेणे, तसेच स्थायी निर्देश क्र.४० दिनांक २० सप्टेंबर, २००६ प्रमाणे प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार यांना ठोक पद्धतीने देय देणे बंधनकारक असणे, असे असतानाही शतमान पद्धतीने देण्यात आल्यामुळे नगरपरिषदेच्या फंडाचे आर्थिक नुकसान होणे, तसेच प्रकल्प व्यवस्थापक सल्लागाराचे पैसे नगर परिषद काटोलने गट नेते व सदस्य यांच्या आदेशावरून अध्यक्ष, उपाध्यक्ष व मुख्याधिकारी यांनी संगनमत करून सभागृहाची मंजूरी न घेता श्री.तडस यांना १३ लाख रूपये नगरपरिषद फंडातून अदा करण्यात येणे, त्याचबरोबर पंचवटी काटोल येथे नगरपरिषदेच्या मालकीचे बाजार ओटे सन २००९-२०१० कालावधीत बांधण्यासाठी विशेष सभा ठराव क्र.५, दिनांक २७ जुलै, २००९ च्या ठरावामध्ये पंचवटी येथे म्हाडा कॉलनीचे खसरा क्र.१८५ /५ खुल्या जागेमध्ये ओटे बांधकामास मंजूरी घेऊन सुवर्ण

जयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत ४ लाख ९२ हजार १३२ एवढी रक्कम खर्च करून ओटे बांधकाम करण्यात येणे, परंतु दिनांक ९ जुलै, २०१७ ला रविवार असताना कनिष्ठ अभियंता यांनी नगर परिषदेचा ठराव नसतानाही ओटे तोडण्याची कार्यवाही करण्यात येणे, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व करावयाची उपाययोजना."

**(५) डॉ. अपूर्व हिरे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नाशिक शहरात पॅनकार्ड क्लब कंपनी लिमिटेड या कंपनीने पंचवटीतील निमानी बस स्टँण्ड समोरील एका व्यापारी संकुलात कार्यालय सुरु करणे, अल्पबचत प्रतिनिधीमार्फत दिडपट, दुप्पट परताव्याचे आमिष दाखवून २२५७ गुंतवणूकदारांकडून सुमारे २० कोटी पेक्षा अधिक रकम जमा करणे, गुंतवणूकदारांना परतावा न देता सर्व गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचे निदर्शनास येणे, नाशिकसह राज्यभरातील २५ लाख गुंतवणूकदारांकडून तब्बल ३ हजार, १०० कोटी रुपये जमा करणाऱ्या पॅनकार्ड क्लबवर नाशिक येथिल पंचवटी पोलिस ठाण्यात ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यासुमारास गुन्हा दाखल केला जाणे, या कंपनीच्या गैरकृत्यांमुळे सन २०१४ मध्येच सेबीने निर्बंध टाकलेले असणे, तरीही पॅनकार्ड क्लब कंपनीने एजंटांचे मजबुत जाळे तयार करून राज्यभरातील गुंतवणूकदारांना विविध आमिषे दाखवून त्यांच्याकडून कोट्यवधीच्या रकमा गोळा करणे व गुंतवणूकदारांची फसवणुक करणे, नाशिक येथे इमू पालन, के.बी.सी., मैत्रेय, हाऊस ऑफ इन्वेस्टमेंट अशा बोगस गुंतवणूक कंपन्यांद्वारे नागरिकांची पुनः पुनः कोट्यवधीची फसवणूक केली जाणे, स्थानिक पोलिस प्रशासनाचे या कंपन्यांकडे दुर्लक्ष होणे, गुंतवणूकदारांच्या फसवणूकीपुर्वीच या बोगस कंपन्यांविरुध्द कारवाई होत नसल्याने फसवणुकीचे प्रकार पुनः पुनः उद्‌भवणे, यात जनतेचे कोट्यवधीचे नुकसान होणे, त्यामुळे नाशिक महानगर परिसरात जनतेत तीव्र नाराजी व संताप व्यक्त केला जाणे, गुंतवणूकदारांनी मोर्चे काढून निषेध व्यक्त करणे, शासनाने बनावट गुंतवणूक कंपन्यांचे जाळे नष्ट करण्याची गुंतवणूकदारांकडून मागणी केली जाणे, तथापि, याकडे शासनाचे दुर्लक्ष होणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(६) ॲड. अनिल परब, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील ५८०० शासकीय वसाहतींची डागडुजी न केल्यामुळे छत कोसळण्याच्या वारंवार घडत असलेल्या घटना, वांद्रे येथील शासकीय वसाहतीची अवस्था देखील दयनीय झाली असून यासंदर्भात लोकप्रतिनिधी सातत्याने विविध आयुधांद्वारे शासनाचे लक्ष वेधूनही वसाहतीच्या प्रश्नाकडे

शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, परिणामी कर्मचारी जीव मुठीत घेऊन मोडकळीस आलेल्या इमारतीमध्ये राहत असणे, वसाहतीच्या छताची अवस्था अत्यंत वाईट झालेली असून कोणत्याही क्षणी काही भाग कोसळून जिवितहानी होण्याची शक्यता, शासकीय वसाहतीत राहणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या पगारातून पैसे शासन घेत असतांनाही दुरुस्तीच्या तक्रारी केल्या असता संबंधित विभागाकडून दुरुस्तीकरिता बजेट नसल्याचे कारण सांगून चलढकल करण्यात येणे, वांद्रे येथे ९६ एकर जागेत शासकीय वसाहत सन १९५९ ते १९७५ च्या दरम्यान बांधलेली असून या वसाहतीमध्ये ३७० इमारती आहेत या ३७० इमारतीपैकी ३६ इमारतींच्या पुनर्बांधणीची कामे सन २०१४-१५ मध्ये रुपये १००.८४ कोटी अर्थसंकल्पात मंजूर करुन इमारतीची अंतर्गत व बाह्य संरचनात्मक व नुतनीकरणाच्या दृष्टीने कामे हाती घेण्यात आली, सदरहू ३६ इमारतीकरिता तरतूद असूनही सध्या काम स्थगित ठेवण्यात आलेले असणे, नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये चतुर्थश्रेणी इमारतीच्या इमारत क्र. १ मधील सदनिका क्र. ११३ मधील स्लॅबचे प्लास्टर पडल्याची घटना, शासकीय वसाहतीचा पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लागावा अशी तेथील कर्मचाऱ्यांची मागणी व सर्वपक्षिय एकमत असतांनाही प्रत्यक्षात कामास सुरवात झालेली नसणे, मा.मुख्यमंत्री तसेच संबंधित विभागाच्या मंत्री महोदयांकडून शासकीय कर्मचाऱ्यांना, लोकप्रतिनिधींनाही आश्वासनापलिकडे काही कार्यवाही झालेली नसणे, नुकतेच माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये सर्व वसाहतीतील कर्मचाऱ्यांना खोल्या खाली करण्याच्या पाठविण्यात आलेल्या नोटिसा, सदर शासकीय जागेवर कोणत्याही प्रकाराचा पूर्वनियोजित आराखडा मंजूर नसताना कर्मचाऱ्यांना जबरदस्ती खोल्या खाली करण्याची करण्यात येत असलेली सक्ती, तेथे राहणाऱ्या कर्मचाऱ्यांनी अनेकवेळा मोर्चे धरणे इत्यादि मार्गाने आंदोलने करणे, कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होणे, निधीची तरतूद असतांना तसेच शासकीय वसाहतींच्या पुनर्विकाससंदर्भात विधानपरिषद / विधानसभा या दोन्ही विद्यमान सभागृहात सविस्तर चर्चा झाली असताना तसेच यासंदर्भात संबंधित मा.मंत्री, सचिव आदिसमवेत बैठका / चर्चा झालेली असतांनाही प्रत्यक्षात कामास सुरुवात झालेली नसणे, सद्य:स्थितीत शासकीय वसाहतींच्या इमारतीची दयनीय अवस्था पाहता पुनर्विकासाचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची आवश्यकता, मा.मंत्रीमहोदयांनी अनेकवेळा आश्वासन देऊन प्रत्यक्षात कार्यवाही झालेली नसणे, याकडे शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका."

(७) **आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पर्यावरण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई, पुणे, बदलापूर, उल्हासनगर या शहरातील नागरिकांच्या

आरोग्यास धोकादायक ठरणाऱ्या प्रदुषणाच्या पातळीत वाढ होणे, मराठवाडयातील काही जिल्ह्यात तर चहाच्या रंगाप्रमाणे गढूळ पाणी नागरिकांना पुरविले जाणे, मुंबईत लाखोंच्या संख्येने धावणारी वाहने व इमारतींची अहोरात्र सुरु असलेली बांधकामे, पायाभूत सुविधांसाठी सुरु असलेली खोद कामे, लघु व काही छोटया उद्योगातून निघणारे वायू, काही ठिकाणी सफाईअभावी रस्त्यांवर उडणारी धुळ, डंपिग ग्राऊंड व अन्य ठिकाणी लागणाऱ्या आगींमुळे होणारे वायू प्रदुषण, इत्यादी मुळे शहर प्रदुषणाचा थेट परिणाम नागरिकांसह प्राण्यांच्या आरोग्यावर होत असणे, त्यामुळे येथील नागरिकांना श्वसन विकार होत असतानाही शासन करीत असलेले दुर्लक्ष, परिणामी येथील नागरिकांत पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, मुंबई सारख्या शहरामध्ये वाहतूक कोंडीमुळे वाहनांचे हॉर्न, डिझेल व पेट्रोल मुळे होणारे प्रदुषण म्हणजेच हवा, पाणी व आवाज या तिन्ही मधील प्रदुषण धोक्याच्या पातळीपर्यंत पोहचणे, नव्या इमारतीमधील पार्किंग पासून सिमेंटच्या रस्त्यापर्यंत सिमेंटचा वापर वाढणे, यामुळे तापमानात वाढ होऊन उष्णतेत वाढ होणे, तसेच पाणी झिरपण्याचा मार्ग बंद होणे, यावर उपाय म्हणून एकीकडे वृक्षरोपण करत असताना मेट्रोच्या कामात असंख्य झाडांची कत्तल होणे, यावर मा.उच्च न्यायालयाने शासनावर ताशेरे ओढणे, इत्यादी बाबींमुळे जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(८) **सर्वश्री. हेमंत टकले,** शरद रणपिसे, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, रामहरी रुपनवर, आनंदराव पाटील, आर्कि. अनंत गाडगीळ, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री. हरिसिंग राठोड, जनार्दन चांदूरकर, प्रा. जोगेन्द्र कवाडे, सर्वश्री. सुभाष झांबड, अमरनाथ राजूरकर, सुनिल तटकरे, किरण पावसकर, नरेंद्र पाटील, आनंद ठाकूर, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री.रविंद्र फाटक, जगन्नाथ शिंदे, प्रकाश गजभिये, धनंजय मुंडे, अमरसिंह पंडित, जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, श्री. नागोराव गाणार, प्रा. अनिल सोले, सर्वश्री. गिरीशचंद्र व्यास, प्रविण दरेकर, परिणय फुके, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात गेल्या वर्षभरात तब्बल १४,३६८ बालमृत्यू झाले असून यापैकी ३०१३ बालमृत्यू हे अवघ्या एक महिन्याच्या आतील नवजात बालकांचे झालेले असणे, यात नाशिक जिल्हा रुग्णालयात गेल्या पाच महिन्यात १८७ बालमृत्यू झालेले असून ऑगस्ट २०१७ मध्ये तब्बल ५५ बालकांचे मृत्यू झाल्यानंतरही या मृत्यूंची तुलना गोरखपूरच्या बालमृत्यूकांडाशी करु नका असे धक्कादायक विधान आरोग्यमंत्री यांनी केल्यामुळे जनतेत निर्माण झालेली कमालीची संतप्त भावना, या जिल्हा रुग्णालयात ठाणे, पालघर पासून थेट नंदूरबार येथून आदिवासी भागातील बालके उपचारासाठी येत असणे यातील

बहुतेक बालके कमी वजनाची असून रुग्णालयाच्या क्षमतेपेक्षा जास्त बालके येथे कायमच दाखल केली जात असणे, नाशिक जिल्हा रुग्णालयात उपचाराअभावी दरमहा ३० बालकांचे होत असलेले मृत्यू, रुग्णालयाचे प्रश्न सोडविण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार मा. आरोग्य मंत्र्यांना पत्र लिहून पाठपूरावा करुनही त्याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबबात आरोग्य यंत्रणा पर्यायाने शासन उदासीन असणे, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

(९) **श्री. विक्रम काळे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील १८८ केंद्रीय आश्रमशाळांना अनुदान मिळणेबाबत तसेच राज्यातील वि.जा.भ.ज. च्या आश्रमशाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांसाठी शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर स्वतंत्र शाळासंहिता तयार करण्यात येणे, प्रारुप तयार होऊन बराच कालावधी होणे, या शाळांना शिक्षण विभागाच्या धर्तीवर शिक्षण हक्क कायदा लागू करण्याची आवश्यकता, या विषयी मराठवाडा विभाग शिक्षक लोकप्रतिनिंधीकडून वेळोवेळी सभागृहात प्रश्न उपस्थित होणे, संबंधित शाळांची तपासणी करुन त्यांचे अ, ब, क व ड असे वर्गीकरण करण्यात येणे, या केंद्रीय आश्रमशाळांना अनुदान देण्याचा व वि.जा.भ.ज. च्या आश्रमशाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांसाठी शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर स्वतंत्र शाळासंहिताबाबत शासन लवकरच निर्णय घेईल असे मंत्री महोदयांनी सभागृहात वारंवार आश्वासन देणे, त्या आश्वासनाची पूर्तता अद्यापपर्यंत न होणे, त्यामुळे शिक्षक-कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१०) **सर्वश्री. सतिश चव्हाण,** अब्दुल्लाखान दुर्राणी, विक्रम काळे, अमरसिंह पंडित, ॲड. निरंजन डावखरे, श्री. जयवंतराव जाधव, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंधारण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कार्यकारी अभियंता लघुसिंचन जलसंधारण विभाग, औरंगाबाद अंतर्गत जलयुक्त शिवार अभियान सन २०१६-२०१७ माहे डिसेंबर मध्ये प्रशासकिय मान्यता मिळालेल्या २२३ गावातील एकूण २१७ सि.ना.बा.कामांच्या निविदा अदयाप निश्चित केलेल्या नसणे, मागील ०६ महिन्यांपासून ई-निविदा कार्यवाही अभावी जुन्या पा.त./गा.त.दुरुस्तीच्या कामाशिवाय एकही नवीन सि.ना.बा.चे काम लघुसिंचन जलसंधारण विभागामार्फत सुरु झालेले नसणे, त्यामुळे २२३ गावे टंचाईमुक्त होण्यापासून वंचित राहिलेली असणे, जलयुक्त शिवार अभियान सन २०१६-२०१७ चा कार्यकाळ दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी संपला असून शासनातर्फे दि. ३० जून

२०१७ ही अंतिम मुदत दिलेली असणे, परंतु कामांच्या निविदा झाल्या नसल्याने अंदाजे ३० कोटी रकमेचा निधी व्यपगत झाला असणे, मार्च, २०१७ पुर्वी ही कामे पूर्ण झाली असती तर अंदाजे २१७० सघमी एवढा पाणीसाठा होऊन २२३ गावांतील पाणी टंचाईवर मात करता येणे शक्य असणे, मात्र कार्यकारी अभियंत्याच्या उदासीनतेमुळे सदरील गावांसाठी प्राप्त रु.०६ कोटी निधी खर्चाविना दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी परत करण्यात आलेला असणे, जलयुक्त शिवाराच्या कामाकडे हेतु परस्पर दुर्लक्ष केलेले असल्याने याची जबाबदारी निश्चित करुन संबंधीतावर कारवाई करण्याची होत असलेली मागणी त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**सात : म.वि.प. नियम १०१ - अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

## - मध्यंतर -

**आठ : शासकीय विधेयक -**

**विधानसभेने संमत केल्यास — विधेयक विचारात घेणे -**

**"सन २०१७ चे वि.स.वि क्रमांक ७७ - महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०१७"**

---

**नऊ : सन २०१२-२०१३ या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्यांवर चर्चा.**

**दहा : शासकीय विधेयके -**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

(१) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६० - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६० - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| (१) मुख्यमंत्री | (२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स. |
| (३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. | (४) श्री.संजय दत्त, वि.प.स. |
| (५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. | (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. |
| (७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स. | (८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. |

(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(२) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६१ - पंढरपूर मंदिर (सुधारणा) विधेयक, २०१७"**

---

**(३) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६२ – महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६२ – महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) मुख्यमंत्री
(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.
(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.
(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(४) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५७ - महाराष्ट्र साक्षीदारास संरक्षण व सुरक्षा देण्याबाबत विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५७ - महाराष्ट्र साक्षीदारास संरक्षण व सुरक्षा देण्याबाबत विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) मुख्यमंत्री
(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.
(३) श्री.शरद रणपिसे,
(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.

वि.प.स.

(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स. (८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.

(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(५) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६३ - महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६३ - महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) मुख्यमंत्री (२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.

(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. (४) श्री.संजय दत्त, वि.प.स.

(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स. (८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.

(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(६) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५६ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५६ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) ग्रामविकास मंत्री (२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा

वि.प.स.

(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.

(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.

(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.

(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.

(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.

(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.

(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**अकरा : (क) (मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, व मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**प्रा.अनिल सोले,** ॲड. अनिल परब, श्री.गिरीश व्यास, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, सर्वश्री. परिणय फुके, रविंद्र फाटक, श्रीमती स्मिता वाघ, सर्वश्री. तानाजी सावंत, मितेश भांगडिया, गोपीकिसन बाजोरिया, प्रविण दरेकर, विनायक मेटे, विजय ऊर्फ भाई गिरकर, सुजितसिंह ठाकूर, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यात विदर्भातील सर्व जिल्हे व मराठवाड्यात पडलेला कमी पाऊस, त्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती विचारात घेण्याची आवश्यकता, या भागातील सिंचनाचा अनुशेष वेगाने पूर्ण करण्याची गरज, विदर्भातील अपुरे सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याकरिता केंद्राच्या सहाय्याने तयार केलेली बळीराजा जलसंजीवनी योजना तातडीने कार्यान्वित करण्याची आवश्यकता, बेंबळा प्रकल्पाच्या कामाला देण्यात आलेली गती, माजी पंतप्रधान स्व.राजीव गांधी यांनी भूमीपुजन केलेल्या गोसीखुर्द प्रकल्पाच्या सर्व परवानग्या प्राप्त करुन प्रकल्पाची किंमत केंद्र शासनाने निश्चित करण्यासाठी झालेली कार्यवाही, अपुऱ्या पावसामुळे मूग, उडीद, सोयाबीन, कापुस, तूर व हरभरा इ.पिकांचे उत्पादन ३० ते ४० टक्क्यांवर येणे, डुक्कर, हत्ती इ. जनावारांमुळे होणारे शेतीचे नुकसान रोखण्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, पाणंद रस्त्यांचे बांधकाम व मजबुतीकरण प्राधान्याने करणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या उद्देशाने उत्पादन खर्च कमी करणे, नैसर्गिक व सेंद्रिय शेती आणि फळबागांच्या लागवडीस प्रोत्साहन देणे, संत्राउद्योग, दुग्धव्यवसाय, कुकुटपालन, मत्स्यव्यवसाय इ. शेतीच्या जोडधंद्यांना प्रोत्साहन देणाऱ्या योजना कार्यान्वित करणे, शेतमालाला किमान हमीभावाप्रमाणे दर मिळण्याची व जेथे कमी भाव असेल तेथे अनुदान देण्याची गरज, जलयुक्त शिवार योजनेमुळे शाश्वत सिंचनाच्या सुविधा उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणात आलेली गती, ही

योजना अधिक प्रभावी करण्याकरिता या योजनेच्या अटी व निकष शिथिल करण्याची आवश्यकता, कृषीपंपांना दिवसा १२ तास वीज उपलब्ध करण्याच्या दृष्टीने सोलर फिडरची योजना कार्यान्वित करणे व वीजपंप जोडणीच्या प्रलंबित अर्जांचा डिसेंबर, २०१७ पर्यंत शीघ्रगतीने निपटारा करण्याची आवश्यकता, राज्यातील वीज वितरण व्यवस्था अधिक मजबुत करण्यासाठी नविन उपकेंद्र, रोहित्र व पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता, सिंचन अनुशेषाच्या भागात अधिक अनुदान देण्याची गरज, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेमध्ये शासनाने ४ हजार ५०० कोटी रुपये उपलब्ध करुन दिले असणे, त्यामुहे ५ हजार गावांमध्ये शेती उत्पादन वाढून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे व शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध झाली असणे, आत्महत्याग्रस्त ६ जिल्ह्यांपेक्षा एकट्या मुंबईला अधिक कर्जमाफी देण्याचे पूर्वीच्या शासनाने धोरण असताना अवघ्या ५ महिन्यात संपूर्ण राज्यभरात कर्जमाफीची प्रक्रिया गतीने पूर्णत्वाकडे येणे, कृषी खात्यातील रिक्त पदे तातडीने भरणे व आशाच्या धर्तीवर शेतकरी मित्र नेमण्याची आवश्यकता, केंद्र शासनाने नदीजोड प्रकल्प राज्यात कार्यान्वित करण्याची आवश्यकता, एमआरईजीएस मध्ये मोठ्या प्रमाणात सिंचन विहिरी करण्याची आवश्यकता, कृषीमालावर आधारित प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी विशेष आर्थिक क्षेत्र उभे करण्याची आवश्यकता, विदर्भाच्या समग्र विकासाला वेग देण्याची आवश्यकता, अमरावती भागात उभारण्यात येणाऱ्या टेक्सटाईल पार्कला अधिक गती देण्याची आवश्यकता, मोर्शीत संत्रा प्रक्रिया प्रकल्प सुरू करणे व संत्रा धोरण जाहिर करणे, मिहानमध्ये मोठ्या संख्येने येत असलेली गुंतवणूक, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना यशस्वीपणे व पारदर्शकरित्या राबविल्यामुळे शेतकरी पुन्हा कर्ज घेण्याकरिता पात्र होणे, मागील ३ वर्षात शासनाने शेतीमधील गुंतवणूक वाढविल्यामुळे शेतीचा विकास दर सतत नकारात्मक राहत असताना हा दर प्रथमच + १२.५ टक्क्यांवर नेण्यास शासनास आलेले यश, राज्यातील शेतकरी कायमस्वरुपी स्वबळावर उभा राहू शकेल व त्याला भविष्यात कर्ज घेण्याची पाळी येणार नाही या दृष्टीने योजना आखून त्या तातडीने कार्यान्वित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(ख) **(मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**ॲड. अनिल परब,** श्री. प्रविण दरेकर, डॉ. (श्रीमती) नीलम गोऱ्हे, सर्वश्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, रविंद्र फाटक, प्रा.अनिल सोले, सर्वश्री. गोपीकिसन बाजोरिया, प्रसाद लाड, सुजितसिंह ठाकूर, रामनिवास सिंह, गिरीशचंद्र व्यास, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. चंदुभाई पटेल, परिणय फुके, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासीपाडे आणि अधिकृत झोपडपट्टीतील रहिवाशी यांना स्थलांतरीत करण्याबाबत शासनाने आखलेली उपाययोजना, सर्वसाधारण पात्र झोपडपट्टीवासियांच्या स्थलांतरासाठी शासनाने घ्यावयाचा सकारात्मक निर्णय, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या सर्व्हे नं. २३९/१ या वन क्षेत्राची मोजणी करुन अतिक्रमित रहिवाश्यांचे त्याच क्षेत्रात पुनर्वसन करण्याबाबत दिंडोशी येथील लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१६ व त्यानंतर वारंवार मा.मुख्यमंत्री, मा.वने मंत्री व मा.गृहनिर्माण मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केलेली मागणी, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन्यप्राण्यांचा शहरात होणारा मुक्त संचार व त्यावर करावयाच्या उपाययोजना, मुंबई शहरातील नद्या व नाले यांच्या रुंदीकरणामुळे बाधीत होणाऱ्या रहिवाश्यांचे त्याचठिकाणी पुनर्वसन करणे, मुंबईतील भुमिपुत्र असलेल्या कोळीवाड्यातील बांधवांना कायमची घरे व कोळीवाड्यांचा पुनर्विकास करण्याची गरज, आशियाखंडातील सर्वात मोठ्या मुंबईतील धारावी येथील झोपडपट्टीचा पुनर्विकास करण्याचा शासनाने घेतलेला महत्वकांक्षी निर्णय, सदरहू झोपडपट्टीचा पुनर्विकास करण्यासाठी शासनाने आखलेली उपाययोजना, मुंबईतील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत आठ आमदारांच्या समितीने केलेल्या शिफारशीवर निर्णय घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असणे, या प्रस्तावावर तातडीने निर्णय होण्याची आवश्यकता, राज्यात पंतप्रधान आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ३३ हजार ५०० व इतरांसाठी ६२५० घरे उभारण्याची म्हाडाने आखलेली उपाययोजना, मुंबईसोबतच पुणे, पिंपरी चिंचवड, कोल्हापूर, नागपूर, नाशिक व सर्व महाराष्ट्रात स्वस्त घरांच्या योजनांना गती देण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**बारा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"मौजे उमापूर (ता.गेवराई, जि.बीड) येथील १५६२ शेतकऱ्यांनी प्रधान मंत्री पिक विमा योजनेंतर्गत सन २०१६ च्या खरीप हंगामासाठी विहित मुदतीत पिक विमा हप्ता रुपये ४९.२२ लाख बँकेत जमा केला असून विमा कंपनीने मौजे उमापूर महसूल मंडळासाठी कापूस व इतर पिकांना विमा मंजूर करणे, परंतु बँक कर्मचाऱ्यांच्या चुकीच्या नोंदीमुळे या शेतकऱ्यांना विम्याची रक्कम प्राप्त न होणे, बीड जिल्ह्यात याच पद्धतीने नाळवंडी, पिंपळनेर व धारूर महसूल मंडळातील हजारो शेतकऱ्यांनाही विम्याची रक्कम मिळालेली नसल्याने हक्काची पिक विमा रक्कम मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी तीव्र आंदोलनाचा इशारा देणे, शासनाने उक्त प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे

शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष, त्यामुळे शेतकऱ्यांना पिक विम्याचा लाभ देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"येवला (जि.नाशिक) येथे शासकीय कृषी महाविद्यालय व शेतकरी प्रशिक्षण केंद्र बांधण्याची आवश्यकता तपासून शासनाला अहवाल सादर करण्याबाबत महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांना शासनाने माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निर्देश दिलेले असणे, शासकीय कृषी महाविद्यालय व शेतकरी प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०१५ व दिनांक ५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद आणि शासनाकडे मागणी केलेली असणे, येवला व लासलगांव (जि.नाशिक) हा परिसर कृषी आणि फलोत्पादनामध्ये अग्रेसर असणे, येवला या ठिकाणी शासकीय कृषी महाविद्यालय व शेतकरी प्रशिक्षण केंद्र झाल्यास जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा कृषी शिक्षणाकडे ओघ वाढणार असणे, परिणामी शेतकऱ्यांना सुद्धा कृषी प्रक्रिया उद्योगांबाबत मार्गदर्शन होवून जिल्ह्यामध्ये अन्न व कृषी प्रकिया उद्योग आणि फलोत्पादनामध्ये वाढ होवून शेतीचा सर्वांगीण विकास करणे सोईचे होणार असणे, परिणामी कृषी क्षेत्राला पर्यायाने शेतकऱ्यांना फायदा होणार असणे, त्यासाठी कृषी विभाग येवला यांच्या मालकीची पुरेशी जागा व मुबलक पाणी पुरवठा उपलब्ध असल्याने येवला येथे शासकीय कृषी महाविद्यालय व शेतकरी प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १९ डिसेंबर, २०१७.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.